# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.10.2025** **वार- बृहस्पतिवार**

**मोहोळ**

जैन समाजाच्या मनात जे आहे, तेच होईल, हा भगवान महावीर यांच्यासमोर दिलेला शब्द आज धर्मादाय आयुक्तांच्या HND बोर्डिंगच्या निकालाने पूर्णत्वास गेला आहे अशी प्रतिक्रिया केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. पुण्यातील जैन बोर्डिंग जमीन प्रकरणाचा वादग्रस्त व्यवहार रद्द करण्याचा निकाल आज धर्मादाय आयुक्तांनी दिला. त्यानंतर पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. हा व्यवहार रद्द व्हावा, यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच अन्य संबंधितांशी सातत्याने संवाद साधत प्रामाणिक प्रयत्न केले, त्याला आजच्या निकालाने यश आलं असं मोहोळ म्हणाले.

**मेट्रो**

पुणे मेट्रोच्या वनाज ते रामवाडी या मार्गाचा पुढे विठ्ठलवाडीपर्यंत विस्तार होणार आहे. यासाठी महामेट्रो निविदा काढणार आहे. या 11 किलोमीटरच्या मेट्रो मार्गात 11 स्थानकं असतील. या भागातही दुमजली पूलही असेल; हा उड्डाणपूल पुणे शिरूर एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पाचा एक भाग आहे.

**वाहतूक कोंडी**

पुणे शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासंदर्भात महापालिका आणि पोलिसांची तीन महिन्यांमधील तिसरी संयुक्त बैठक काल झाली. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, वाहतूक पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव आदी यावेळी उपस्थित होते. पुण्यात दरवर्षी चार लाख नव्या खासगी वाहनांची भर पडत आहे. ऑटो रिक्षांचे परवाने खुले केल्याने रिक्षांची संख्याही सव्वा लाखाच्या वर गेली आहे. त्यामुळे नवीन रिक्षा परवाने देण्यावर निर्बंध आणणं आवश्यक असल्याचं पोलिसांनी यावेळी सांगितलं. याबाबत राज्य सरकारला विनंती केली जाणार आहे.

**कर संकलन**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाने 2025-26 या आर्थिक वर्षात आतापर्यंत 624 कोटी 85 लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तो लवकरात लवकर भरावा, असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**ऊस तोडणी**

ऊस तोडणीसाठीचा दर प्रति टन 500 रुपयांवरून 700 रुपये करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मशिन मालक संघटनेने केली आहे. या प्रमुख मागणीसह अन्य काही मागण्यांचं निवेदन संघटनेचे सचिव अमोलराजे जाधव यांनी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते सादर केलं आहे. या मागण्या मान्य झाल्या माहीत, तर येत्या एक नोव्हेंबरपासून ऊस तोडणी मशीन मालक, ऊस तोडणीच्या कामकाजात सहभागी होणार नाहीत, असा इशारा संघटनेने दिला आहे.

**<u>यकृत प्रत्यारोपण</u>**

पुण्यातील सह्याद्री रुग्णालयात यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियेनंतर पती-पत्नीचा मृत्यू झाल्याप्रकरणी उच्चस्तरीय समितीचा अहवाल आला असून त्यावरील कार्यवाही दोन महिन्यांनंतरही प्रलंबित आहे. याच प्रकरणी वैद्यकीय हलगर्जीपणाची चौकशी करण्यासाठी ससून सर्वोपचार रुग्णालयाला पत्र मिळालं आहे, त्यामुळे आता ‘ससून’ची समिती नेमली जाईल. त्यानंतर आरोग्य संचालक पुढील आठवड्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेऊन अंतिम निर्णय घेतील अशी माहिती आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. भगवान पवार यांनी दिली.

**<u>वंडरफोल्ड</u>**

इंदुताई टिळक कला केंद्र आणि ओरिगामी मित्र संस्थेनं पुण्यात टिळक स्मारक मंदिर इथं 'वंडरफोल्ड' या ओरिगामी कला प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. या प्रदर्शनाचं यंदाचं हे 18वं वर्ष आहे. येत्या रविवारपर्यंत सकाळी 10 ते रात्री 8 या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुलं असेल.

**<u>लोकशाही दिन</u>**

येत्या सोमवारी म्हणजे 3 नोव्हेंबरला सकाळी 11 वाजता पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनाचं आयोजन करण्यात येणार आहे. निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी आज ही माहिती दिली.

**<u>रुग्ण हक्क परिषद</u>**

रुग्ण हक्क परिषदेनं यंदाच्या दिवाळीमध्ये अनावश्यक खर्च टाळून संपूर्ण निधी अतिवृष्टीग्रस्तांसाठी दान केला. सामाजिक कार्यकर्ते विकास बधे यांनी पाच लाख रुपये जमा करून हा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीला सुपूर्द केला.

**<u>निधन</u>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, सिंहगड भागाचे संघचालक, आणि 'कौशिक आश्रम' संस्थेचे अध्यक्ष, सुनील राऊत यांचं आज पहाटे पुण्यात हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते 69 वर्षांचे होते. राऊत यांनी संघाच्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या. आज दुपारी वैकुंठ स्मशानभूमी इथं त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज अंशतः ढगाळ हवामान होतं, आज कमाल तापमान 29 तर किमान तापमान 19 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या दुपारनंतर हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**